राष्ट्रीय दूध दिन

दुग्ध व्यवसायातून समृद्धीकडे वाटचाल

डॉ.धनराज चौधरी,
डॉ. राहुल देसले, डॉ. दिनेश नांद्रे

राष्ट्रीय दूध दिन हा केवळ दूध उत्पादनाचा उत्सव नसून शेतकरी, पशुपालक, दुग्ध उत्पादक महिला, सहकारी संस्था आणि दुग्ध क्षेत्रातील सर्व घटकांच्या योगदानाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याबरोबरच रोजगारनिर्मिती, महिला सक्षमीकरण आणि पोषणसुरक्षा साध्य करण्यात दुग्धव्यवसायाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.



पशुपालन उद्योगात महिलांना रोजगाराची चांगली संधी तयार झाली आहे.

देशातील दूध उत्पादन वाढविणे, दुग्ध व्यवसायाचे आर्थिक व सामाजिक महत्त्व अधोरेखित करणे आणि दुग्ध क्षेत्रातील विविध घटकांच्या योगदानाचा गौरव करणे या उद्देशाने दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस 'राष्ट्रीय दूध दिन' म्हणून साजरा केला जातो. भारत आज जगातील सर्वाधिक दूध उत्पादन करणारा देश म्हणून ओळखला जातो. देशातील दूध उत्पादनात सातत्याने वाढ होत असून ग्रामीण अर्थव्यवस्था, रोजगारनिर्मिती आणि पोषणसुरक्षेमध्ये दुग्ध व्यवसाय महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. देशातील एकूण दूध उत्पादन २४७.८७ दशलक्ष टन असून मागील वर्षाच्या तुलनेत त्यामध्ये सुमारे ४ ते ५ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. परदेशी व संकरित गाईंच्या दूध उत्पादनात ४.९७ टक्के, देशी व अवर्गीत गायींच्या दूध उत्पादनात ३.५१ टक्के, तर म्हशींच्या दूध उत्पादनात २.४५ टक्के वाढ झाली आहे. जागतिक स्तरावर सुमारे ५७ टक्के म्हशी आणि १६ टक्के जनावरे भारतात आहेत. देशातील एकूण दूध उत्पादनापैकी सुमारे ४४ टक्के दूध गायींपासून, ५४ टक्के म्हशींपासून, तर उर्वरित २ टक्के दूध शेळ्या व मेंढ्यांपासून मिळते. उत्पादित दुधापैकी सुमारे ४६ टक्के दूध द्रवरूपात वापरले जाते, तर ५४ टक्के दूध विविध दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाते. दुधाचे पौष्टिक महत्त्व आणि दैनंदिन आहारातील त्याचा वाढता वापर यामुळे देशात दुधाची मागणी सातत्याने वाढत आहे.

राष्ट्रीय दूध दिनाचे महत्त्व

भारतातील श्वेतक्रांतीचे जनक आणि अमूल सहकारी दुग्ध चळवळीचे शिल्पकार डॉ. वर्गीस कुरियन यांच्या जयंतीनिमित्त २६ नोव्हेंबर हा दिवस २०१४ पासून राष्ट्रीय दूध दिन म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ आणि इंडियन डेअरी असोसिएशन यांच्या पुढाकाराने या दिवसाची सुरुवात झाली. डॉ. कुरियन यांनी सहकारी तत्त्वावर दुग्धव्यवसायाची उभारणी करून भारताला दूध उत्पादनाच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर महत्त्वाचे स्थान मिळवून दिले. त्यांच्या दूरदृष्टीतून राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन फ्लड' या कार्यक्रमामुळे देशातील दूध उत्पादन, संकलन, प्रक्रिया आणि वितरण व्यवस्थेत मोठी क्रांती घडून आली. शेतकऱ्यांना संघटित बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबरोबरच दूध उत्पादकांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळवून देण्यात या चळवळीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये दुग्ध व्यवसायाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. दुग्ध व्यवसायामुळे ग्रामीण भागात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतात. शेतीतील पिकांचे अवशेष, कडबा, भुसा आणि इतर कृषी उपपदार्थांचा जनावरांच्या खाद्यासाठी उपयोग करून उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करता येतो. तसेच जनावरांच्या शेणापासून सेंद्रिय खत आणि जैविक ऊर्जेची निर्मिती करता येते. यामुळे शेती व पशुपालन यांचा समन्वय साधून एकात्मिक शेती पद्धतीला चालना मिळते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे स्रोत विविध होतात.

शास्त्रीय व्यवस्थापनाची गरज

- दुग्ध व्यवसाय अधिक फायदेशीर, उत्पादनक्षम आणि शाश्वत करण्यासाठी जनावरांचे शास्त्रीय व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये योग्य जातींची निवड, संतुलित आहार, स्वच्छ व हवेशीर गोठा, नियमित लसीकरण, जंतनाशन, रोगप्रतिबंधक उपाययोजना आणि योग्य प्रजनन व्यवस्थापन यांचा समावेश होतो. दुभत्या जनावरांना त्यांच्या दूध उत्पादन क्षमतेनुसार हिरवा चारा, सुका चारा आणि संतुलित पशुखाद्य योग्य प्रमाणात देणे आवश्यक आहे.
- आहारामध्ये खनिज मिश्रण आणि स्वच्छ पाण्याचा पुरेसा पुरवठा करावा. जनावरांच्या शरीरस्थितीनुसार आणि दूध उत्पादनानुसार आहाराचे नियोजन केल्यास त्यांचे आरोग्य व उत्पादनक्षमता टिकवून ठेवता येते.
- वासरांच्या जन्मानंतर शक्य तितक्या लवकर चीक पाजणे, योग्य संगोपन करणे, वेळेवर लसीकरण व जंतनाशन करणे आणि नियमित आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे. यामुळे भविष्यात निरोगी व उत्पादक पशुधन तयार होण्यास मदत होते. तसेच जनावरांच्या प्रजनन चक्राची नोंद ठेवून योग्य वेळी माज ओळखणे आणि वेळेवर कृत्रिम रेतन करणे यामुळे प्रजनन कार्यक्षमता सुधारता येते.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

आधुनिक काळात दुग्धव्यवसाय अधिक कार्यक्षम, गुणवत्तापूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. यामध्ये यांत्रिक दूध काढणी यंत्रे, दूध थंड करण्याची यंत्रणा, दूध गुणवत्ता तपासणी उपकरणे, संतुलित पशुखाद्य नियोजन, कृत्रिम रेतन, लिंग वर्गीकृत वीर्य तंत्रज्ञान आणि पशुधन आरोग्यविषयक नोंद व्यवस्थापन यांचा समावेश होतो. दूध उत्पादनापासून ते ग्राहकांपर्यंत पोहोचेपर्यंत स्वच्छता, गुणवत्ता आणि अन्नसुरक्षा मानकांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. दूध काढण्यापूर्वी व नंतर कासेची स्वच्छता, दूध काढण्याच्या भांड्यांची निर्जंतुकता, दुधाचे योग्य तापमानात शीतकरण आणि स्वच्छ वाहतूक यामुळे दुधाची गुणवत्ता टिकवून ठेवता येते. तसेच 'फार्म टू फोर्क ट्रेसेबिलिटी' म्हणजेच दूध उत्पादनापासून ते ग्राहकांपर्यंत पोहोचेपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचा मागोवा ठेवण्याच्या पद्धतीमुळे पारदर्शकता व ग्राहकांचा विश्वास वाढविण्यास मदत होते.

महिला सक्षमीकरणाची साथ

ग्रामीण भागातील महिला दुग्धव्यवसायाच्या माध्यमातून कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. जनावरांचे संगोपन, दूध काढणे, खाद्य व्यवस्थापन आणि दूध विक्री यामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग असतो. दूध संकलन केंद्रे, महिला दुग्ध उत्पादक सहकारी संस्था आणि बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध होत आहेत. दुग्ध सहकारी संस्थांमुळे दूध उत्पादकांना संघटित बाजारपेठ उपलब्ध होते. दूध संकलन, प्रक्रिया, साठवणूक आणि विक्री यांची सक्षम व्यवस्था निर्माण होते. यामुळे दूध उत्पादकांना नियमित बाजारपेठ आणि योग्य मोबदला मिळण्यास मदत होते. दुग्धव्यवसायातील महिलांचा सहभाग वाढविणे, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे आणि आर्थिक निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे हे ग्रामीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

दुधाचे पोषणमूल्य

- दूध हा पोषणमुल्यांनी समृद्ध असा महत्त्वाचा अन्नघटक आहे. दुधामध्ये उच्च प्रतीची प्रथिने, कॅल्शियम, फॉस्फरस, जीवनसत्त्वे आणि शरीराच्या वाढीसाठी आवश्यक असणारे विविध पोषक घटक असतात.
- लहान मुलांची शारीरिक वाढ, हाडे व दातांचे आरोग्य आणि शरीराच्या पोषणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी दूध व दुग्धजन्य पदार्थ महत्त्वपूर्ण ठरतात. दूध, दही, ताक, लोणी, तूप, पनीर आणि चीज यांसारख्या पदार्थांचा संतुलित आहारात समावेश केल्यास पोषणसुरक्षा बळकट करण्यास मदत होते. त्यामुळे दूध हे केवळ आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे उत्पादन नसून देशाच्या पोषण सुरक्षेचा एक महत्त्वाचा आधार आहे.

- डॉ.धनराज चौधरी,
९६५७९६३०९१
(विषय विशेषज्ञ, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र,
कृषी विज्ञान केंद्र, धुळे)